RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ८]　　शुक्रवार, जानेवारी १२, २०१८/पौष २२, शके १९३९　　[पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जानेवारी २०१८.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक गौखनि-१०/०२१५/प्र.क्र.९२/ख.––महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा.४१) याचे कलम ४८ चे पोट-कलम (९) व कलम ३२८ चे पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) चे खंड (एकोणीस) तसेच कलम ३२९ या अन्वये प्रदान करण्यात आलेल्या व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत असून, हे नियम उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

१. या नियमांस, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) (सुधारणा) नियम, २०१७, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे), नियम, १९६८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) मधील नियम २ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल,––

**" २. गावकऱ्यांनी त्यांच्या स्वतःच्या वापरासाठी वाळू वगळून इतर गौण खनिज काढणे :—** या नियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, तहसीलदारांची लेखी पूर्वपरवानगी घेऊन परंतु, कोणतीही फी किंवा स्वामित्वधन न आकारता कोणत्याही गावातील कोणत्याही रहिवाशास त्याच्या घरगुती किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी, विहिरी बांधण्यासह महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) मधील कलम २२ अन्वये या प्रयोजनार्थ, जिल्हाधिकाऱ्याने अभिहस्तांकित न केलेल्या कोणत्याही आकारणी न केलेल्या शासकीय पडीत जमिनीतून किंवा राज्य शासनाकडे ज्याचे हक्क निहित आहेत अशा कोणत्याही तळ्यातून दोन ब्रासपेक्षा अधिक नाही एवढे गौण खनिज (माती, दगड, कंकर, खडक किंवा मुरूम) काढता येईल. अशी लेखी परवानगी असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत तहसिलदाराकडून देण्यात येईल.

परंतु कोणत्याही तळ्यामध्ये त्याच्या काठावरून पडलेला कोणताही दगड काढता येणार नाही आणि अशा तळ्याच्या बांधाच्या पायापासून ४.५ मीटर अंतराच्या परिसरात कोणतेही उत्खनन करता येणार नाही."

३. मुख्य नियमाच्या नियम ३ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

**" ३. गावकऱ्यांनी त्यांच्या स्वतःच्या वापरासाठी वाळू काढणे :—** या नियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, तहसीलदारांची लेखी पूर्व-परवानगी घेऊन आणि जिल्हाधिकारी यांनी वाळू उत्खननासाठी पर्यावरण अनुमती घेऊन लिलावासाठी निश्चित केलेल्या वाळूघाटापैकी लिलावात यशस्वीरित्या बोली न लावलेल्या वाळूघाटासाठी निर्देशित केलेल्या प्रचलित दरानुसार स्वामित्वधनाचे प्रदान करून, कोणत्याही गावातील कोणत्याही रहिवाशास त्याच्या घरगुती किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी विहीर बांधण्यास दोन ब्रासपेक्षा अधिक नाही एवढी वाळू काढण्यास परवानगी देईल. तहसीलदार, वाळू उत्खननासाठी असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत अशा प्राप्त अर्जाची छाननी करून वाळू उत्खननासाठी निश्चित केलेल्या वाळूघाटामधून वाळू काढण्यास परवानगी देऊ शकेल."

४. मुख्य नियमातील नियम ५ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" **५. बंदराच्या हद्दीमधील व सागरी विनियमन क्षेत्रामधील उत्खनन :—** (एक) नियम ७ च्या तरतुदींच्या अधीनतेने, कोणताही तहसीलदार किंवा नायब तहसीलदार बंदराच्या हद्दीमधील किंवा कोणत्याही बंदराच्या काठावरील किंवा किनाऱ्यावरील कोणत्याही जमिनीमधून मीठ आयुक्तांच्या लेखी सहमतीखेरीज आणि त्यांच्याकडून लादण्यात येतील अशा शर्तीअन्वये कोणत्याही असल्यास नियम २, ३ किंवा ४ अन्वये कोणतेही गौण खनिज उत्खनन करण्यास किंवा काढण्यास परवानगी देणार नाही."

**स्पष्टीकरण :—** या नियमाच्या प्रयोजनाकरिता " मीठ आयुक्त " या संज्ञेचा अर्थ, केंद्रीय उत्पादन शुल्क अन्वये तयार करण्यात आलेले केंद्रीय उत्पादन शुल्क नियम, १९४४ आणि मीठ अधिनियम, १९४४ (१९४४ चा १) अन्वये वेळोवेळी सुधारणा केलेल्या प्रमाणे मीठाच्या संबंधात जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी ज्यास अधिकार प्रदान करण्यात आले आहेत, असा मीठ आयुक्त असा आहे.

(दोन) तहसीलदार, सागरी विनियमन क्षेत्रातील समुद्राच्या तळातून किंवा खाडीच्या पात्रातून वाळू काढण्यास किंवा उत्खनन करण्यास परवानगी देणार नाही आणि अशा उत्खननाबाबत कोणताही अर्ज प्राप्त झाल्यास, त्यांच्याकडून तो जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात येईल, जो यासंबंधात शासनाने तयार केलेल्या धोरणानुसार निकालात काढील."

५. मुख्य नियमातील नियम ६ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" **६. विवक्षित प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी आवश्यक असणे :—** नियम २, ३ किंवा ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकारी त्याला योग्य वाटतील अशा प्रकरणांमध्ये किंवा अशा ठिकाणाबाबत त्याची पूर्वमंजुरी मिळविल्याशिवाय, तहसीलदार किंवा नायब तहसीलदारास परवानगी देण्यास मनाई करू शकेल आणि अशा कोणत्याही बाबतीत परवानगीसाठी केलेले सर्व अर्ज आदेशाकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात येतील."

६. मुख्य नियमातील नियम ८ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" **८ नियमांचा भंग केल्याबद्दल शास्ती :—** या नियमांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचा भंग करणारी कोणतीही व्यक्ती, अशा भंगामुळे होणाऱ्या कोणत्याही इतर परिणामांखेरीज जिल्हाधिकारी, अशा व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर त्यास लादण्यास योग्य वाटेल अशी, अशा गौण खनिजाच्या स्वामित्वधनाच्या पाच पटीपेक्षा जास्त नसेल किंवा एक हजार रुपये यापैकी जी रक्कम जास्त असेल इतक्या रकमेच्या शास्तीस या शिक्षेस पात्र होईल. "

७. मुख्य नियमातील नियम ८ नंतर खालील नियम समाविष्ट करण्यात येईल :-

**" ९. कलम ४८ मधील पोट-कलम ८ खालील शास्ती व वैयक्तिक जातमुचलका :–** (१) कलम ४८ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींअन्वये जप्त केलेली, अनधिकृतपणे गौण खनिज काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरलेली यंत्रसामग्री व साधनसामग्री आणि त्यांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वाहतुकीची साधने, खालील तक्यात नमूद केलेली शास्तीची रक्कम प्रदान केल्यानंतर आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ४८ मधील पोट-कलम (८) मधील तरतुदीनुसार वैयक्तिक जातमुचलका सादर केल्यानंतर सोडण्यात येतील.

**तक्ता-इ**

| अनु.क्र. | वाहने/साधनांचे प्रकार | वाहने/साधनां निहाय शास्तीची रक्कम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ड्रील मशीन | रुपये २५,०००/- |
| २ | ट्रॅक्टर, ट्रॅक्टर ट्रॉली, हाफ बॉडी ट्रक, सक्शन पंप | रुपये १,००,०००/- |
| ३ | फुल बॉडी ट्रक, डंपर, ट्रॉलर, कंप्रेसर | रुपये २,००,०००/- |
| ४ | ट्रॉलर, बार्ज, मोटोराईज्ड बोट | रुपये ५,००,०००/- |
| ५ | एक्सकॅवेटर, मॅकेनाईज्ड लोडर | रुपये ७,५०,०००/- |

(२) **वैयक्तिक जातमुचलका** — (एक) कलम ४८ च्या पोट-कलम (८) खाली जप्त केलेल्या यंत्रसामग्री, साधनसामग्रीचा किंवा वाहतुकीच्या साधनांचा मालक अनधिकृतपणे गौण खनिज काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरलेली यंत्रसामग्री व साधनसामग्री आणि त्यांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वाहतुकीची साधने यांच्या बाजारमुल्यापेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेसाठी जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार जातमुचलका सादर करेल.

(दोन) वैयक्तिक जातमुचलकामध्ये इतर बाबींसोबत खालील तपशीलांचा समावेश असेल :–

(अ) वैयक्तिक जातमुचलकाच्या निष्पादक किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या वैयक्तिक अचल संपत्तीची जसे जमीन, घर इत्यादी माहिती, त्यासंबंधीच्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह जसे गाव नमुना क्र.७/१२, मालमत्ता पत्रक इत्यादीचा तपशील देईल. ज्यावर अशा जातमुचलकाचा भंग झाल्यास, वैयक्तिक जातमुचलक्याची रक्कम वाढविण्याचा अधिकार शासनास असेल; किंवा

(ब) वैयक्तिक जातमुचलक्याच्या निष्पादकाने सादर केलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या नावाने वैयक्तिक जातमुचलकाच्या निष्पादकाने ताबेगहाण ठेवलेल्या प्रतिभूती किंवा राष्ट्रीयकृत बँकेची बँक हमी यांचा तपशील, अशा जातमुचलकाच्या रकमेइतकी सममुल्य रकमेचा, अशा जातमुचलक्याच्या रकमेइतकी सममुल्य रकमेबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले नादारी प्रमाणपत्र;

(क) अशी जप्त केलेली यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा वाहतुकीची साधने भविष्यात अनधिकृतपणे गौण खनिज काढण्यासाठी, ते हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, किंवा उचलण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी किंवा त्याची वाहतूक करण्यासाठी वापरणार नाही असे नमूद करणारी वैयक्तिक जातमुचलकाच्या निष्पादकाने दिलेली हमी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 12th January 2018

*NOTIFICATION*

Maharashtra Land Revenue Code, 1966.

No. Gaukhani-10/0215/C.R. 92/Kh.—In exercise of the powers conferred by sub-section (*9*) of Section 48 and sub-section (*1*) and clause (*xix*) of sub-section (*2*) of Section 328 read with sub-section (*2*) of Section 329 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharahtra hereby makes the following rules further to amend the Maharahtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) Rules, 1968, the same having been previously published as required by sub-section (*1*) of the Section 329 of the said Code, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) (Amendment) Rules, 2017.

2. For rule 2 of the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) Rule, 1968 (hereinafter referred to as "the principal Rules"), the following Rules shall be substituted, namely :—

" *2. Removal of Minor Minerals except sand by villagers for their own use*.—Subject to the provisions of these rules, with the prior permission of the Tahsildar in writing but without payment of any fee or royalty, any resident of any village may, for his own domestic or agricultural purpose, including building of well, remove not more than two brass of each minor mineral (earth, bank, stone, kankar, gravel or murum), from any unassessed Government waste land assigned by the Collector for this purpose under section 22 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), or any tank, right to which is vested in the State Government. Such written permission shall be granted by the Tahsildar within a period of fifteen days from the date of receipt of such application :

Provided that, no stone from any tank which may have fallen in it from its bank shall be removed and no excavation shall be made within 4.5 meters of the foot of the embankment of any such tank.".

3. For rule 3 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"*3. Removal of sand by villagers for their own use*.— Subject to the provisions of these rules, any resident of any village may, for his own domestic or agricultural purpose, including building of well, may be permitted to remove not more than two brass sand, with the prior permission of the Tahsildar in writing and on payment of royalty as per the prevailing rates from a sand ghat designated by the Collector for this purpose, out of the sand ghats which were put to auction after obtaining environmental clearance but were not

successfully bid for. The Tahsildar, after examining such application for removal of sand, may grant permission to remove sand from such a sand ghat which is designated for this purpose within a period of fifteen days, from the date of receipt of such application.".

4. For rule 5 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"*5. Extraction within port limits and Coastal Regulation Zone.*— (*i*) Subject to the provisions of Rule 7, no Tahsildar or Naib Tahsildar may permit any removal or extraction of minor mineral under rule 2, 3 or 4 from any land within port limits, or on the banks or shore of any port without the written concurrence of the Salt Commissioner and under such conditions, if any, as he may impose.

*Explanation*.— For the purposes of this rule, the " Salt Commissioner" means the Salt Commissioner who is empowered to exercise the powers of the Collector in relation to salt under the Central Excise Rules, 1944, made under the Central Excise and Salt Act, 1944 (I of 1944), as amended from time to time.

(*ii*) No removal or extraction of sand shall be permitted by Tahsildar from the bed of the sea or creek in the Coastal Regulation Zone and any application received for such extraction shall be referred by him to the Collector who shall dispose of the same in accordance with the policy formulated by the Government in this regard.".

5. For rule 6 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

" *6. Collector's sanction necessary in certain cases.*—Notwithstanding anything contained in rule 2, 3 or 4, the Collector may, in such cases or in respect of such localities as he thinks fit, prohibit a Tahsildar or Naib Tahsildar from giving permission without obtaining the previous sanction of the Collector and in such case, all applications for permission shall be referred to the Collector for orders.".

6. For rule 8 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

" *8. Penalty for breach of rules* .— Any person commiting a breach of any of the provisions of these rules, in addition to any other consequences that would ensue from such breach, be punishable with such penalty of an amount not more than five times of royalty payable on such minor mineral or rupees one thousand whichever is more, as the Collector may, after giving such person an opportunity of being heard, deem fit to impose.".

7. After rule 8 of the principal Rules, the following rule shall be added, namely :-—

" *9. Penalty under sub-section (8) of Section 48 and personal bond.—(1)* The machinery and equipment used for unauthorized extraction, removal, collection, replacement, picking up or disposal of minor minerals and means of transport used for transportation thereof seized under the provisions of sub-section *(8)* of Section 48 may be released only after payment of penalty as mentioned in Table herein below, and after submission of a personal bond as stipulated under sub-section *(8)* of Section 48 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) :—

TABLE

| Sr. No. (1) | Type of Vehicle / Equipment (2) | Penalty per Vehicle/ Equipment (3) |
|---|---|---|
| 1 | Drill machine | Rs. 25,000 |
| 2 | Tractor, Tractor Trolley, Half body truck, Suction pump | Rs. 1,00,000 |
| 3 | Full body truck, dumper, troller, compressor | Rs. 2,00,000 |
| 4 | Trawler, barge, motorized boat | Rs. 5,00,000 |
| 5 | Excavator, mechanized loader | Rs. 7,50,000 |

*(2) Personal Bond*.— *(i)* The owner of the machinery, equipment or means of transport seized under sub-section *(8)* of Section 48 shall furnish personal bond as per the direction of the Collector or the officer authorized by the Collector under sub-section *(8)* of Section 48, for an amount not exceeding the market value of such seized machinery, equipment or means of transport, used for unauthorized extraction, removal, collection, replacement, picking up or disposal of minor minerals or transportation thereof.

*(ii)* The Personal Bond shall *inter alia* contain following details, namely :—

(*a*) Details of personal immovable property *i.e.* land, house etc. of the executant of the personal bond or his family member, supported by certified copies of documents such as Village Form No. 7/12 extracts, property card, etc. over which the Government shall have right to create a charge to the extent of the amount of the personal bond, in the event of any breach of such bond ; or

(*b*) details of the Securities pledged by the executant of the personal bond in favour of the Collector, or the Bank Guarantee of any Nationalized Bank, furnished by the executant of the personal bond of an amount equal to the amount of such Bond or solvency certificate issued by competent Authority of an amount equal to the amount of such bond ; and

(*c*) an undertaking of the executant of the personal bond stating that such seized machinery, equipment or means of transport shall not be used in future for unauthorized extraction, removal, collection, replacement, picking up or disposal of minor minerals and transportation of the same.”.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.